सकाळ

# एमपीएससीचा निकाल वर्षभरानंतरही प्रलंबित

**पुणे, ता. २४ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २०१७ मध्ये अभियांत्रिकी सेवा परीक्षा घेतली, मात्र एक वर्ष उलटले तरीही अद्याप या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे परीक्षार्थी नाराजी व्यक्त करत आहेत.

लोकसेवा आयोगामार्फत 'महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा' २०१७ मध्ये घेण्यात आली. जलसंपदा तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत विविध संवर्गातील एकूण १९९ पदांच्या भरतीसाठी ही परीक्षा घेण्यात आली.

मुख्य परीक्षा डिसेंबरमध्ये घेण्यात आली. त्यानंतर २०१८ मध्ये अभियांत्रिकी सेवा परीक्षा १५० जागांसाठी घेण्यात आली. नोव्हेंबर २०१८ मध्ये अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा झाली, याही परीक्षेचा निकाल अद्याप जाहीर झाला नसल्याने परीक्षार्थी निकालाच्या प्रतीक्षेत आहेत. या परीक्षेचा निकाल तयार असून, केवळ न्यायालयात समांतर आरक्षणाचे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे आयोगाने निर्णय जाहीर केलेला नाही, असे कारण आयोगामार्फत परीक्षार्थींना सांगितले जात आहे. मात्र, याबाबत आयोगाकडे विचारणा केली असता कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही.

Pune, Main
25/12/2018 Page No. 2